माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२२८७**

**अपिलार्थी श्री. आनंद पारकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा,
मुंबई यांचे कार्यालय, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी**
मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा,
मुंबई यांचे कार्यालय, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १९.११.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १८.०३.२०२४ | | ३०.०४.२०२४ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०७.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. १८.०३.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्याकडे माहिती अर्ज सादर करुन पुढील माहितीची मागणी केली होती:- *"महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. २०.११.२०२३ चे पत्र क्र. संकिर्ण- १०२३/प्र.क्र. ५०/(निवास- १)/२२ च्या अनुषंगाने आपण किंवा आपल्या कार्यालयाने केलेल्या कारवाईचा तपशिल मिळण्याबाबत."*

जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ३०.०४.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.१८.११.२०२५ आयोगास सादर करुन नमुद केले की, आपणास विनंती करतो की, उद्याच्या सुनावणी ऐवजी पुढील तारीख देण्यात यावी भविष्यात अपीलाची सुनावणी निश्चित करण्यापूर्वी किंवा निश्चित केलेल्या दिनांक पूर्वी माझ्या मोबाईलवर संपर्क करुन किंवा मला पत्र पाठवून मला कमीत कमी ८ दिवस आधी कळवावे. जेणेकरुन मला तिथे उपस्थित राहण्याची वाजवी संधी मिळेल.

..२/-

४. उपलब्ध अभिलेखावरुन आयोगाच्या असे निदर्शनास येते की, अपिलार्थींना दि. २९.१०.२०२५ रोजी सुनावणी नोटीस निर्गमित करण्यात आलेली आहे व प्रचलित कार्यपध्दतीनुसार अपिलार्थींना मोबाईल क्रमांकावर संपर्क साधने अपेक्षित नाहीत.

५. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, अभियांत्रिकी विभाग उपस्थित असून त्यांच्याकडे सदर प्रकरणाची माहिती उपलब्ध नव्हती व त्यांनी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे.

६. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय तसेच आज उपस्थित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपलब्ध माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ११.१२.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

प्रदीप व्यास
20-11-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २०.११.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२२८७
## अपिलार्थी श्री. आनंद पारकर
## सुनावणी दिनांक : ११.१२.२०२५ (In continuation of order dt २०.११.२०२५)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, अभियांत्रिकी विभाग उपस्थित असून त्यांच्याकडे सदर प्रकरणाची माहिती उपलब्ध नव्हती व त्यांनी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय तसेच आज उपस्थित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी उपलब्ध माहितीसह उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी, अभियांत्रिकी विभाग उपस्थित आहेत. आयोगाचे स्पष्ट आदेश असून सुध्दा जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहेत.

प्रथम अपिलीय अधिकारी, अभियांत्रिकी विभाग उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, त्यांचा सदर प्रकरणाशी काहीही संबंध नाही. तसेच मूळ माहिती अर्ज व प्रथम अपील अर्ज त्यांना अप्राप्त आहे.

३. आयोगाच्या असे निदर्शनास येते की, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी सुनावणीस वारंवार अनुपस्थित राहतात व अपिलार्थींना त्यांच्याकडील प्राप्त माहिती अधिकार अधिनियमातील अर्जावर विहित मुदतीत उत्तर किंवा माहिती प्राप्त होत नाही. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की,

### आदेश

**१. संबंधित जन माहिती अधिकारी तथा सचिव प्राधिकरण, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ हे आजच्या द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

..२/-

२. श्रीमती आसावरी सानप, प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ हे आजच्या द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिल्यामुळे त्यांच्याविरूध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि. ३१.०३.२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतच्या लेखी खुलासासह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे. सदर लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरून शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

३. सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १४.०१.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.

State Information Commission Greater Mumbai

मुंबई
दिनांक : १२.१२.२०२५

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**प्रत** - १) संबंधित जन माहिती अधिकारी तथा सचिव प्राधिकरण, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचे कार्यालय, कलानगर, बांद्रा (पू), मुंबई – ४०० ०५१.

२) श्रीमती आसावरी सानप, प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचे कार्यालय, कलानगर, बांद्रा (पू), मुंबई – ४०० ०५१.

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२२८७
## अपिलार्थी श्री. आनंद पारकर
## सुनावणी दिनांक : १४.०१.२०२६ (In continuation of order dt १२.१२.२०२५)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १०.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०८.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. ०८.०१.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी संबंधीत जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर अनुक्रमे शास्तीची व शिस्तभंगविषयक कार्यवाही का प्रस्तावित करण्यात येऊ नये याबाबतचा लेखी खुलासा सादर करण्याचे आयोगाने आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

३. श्रीम. आसावरी सानप, प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई यांनी दि. ०१.०१.२०२६ रोजी प्रशासकीय अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना लिहिलेले पत्र आयोगास सादर केले आहे. त्यामध्ये पुढीलप्रमाणे नमुद केलेले आहे:-

*"अपिलार्थी श्री. आनंद पारकर यांचा दि. १८.०३.२०२४ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गतचा अर्ज मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण या कार्यालयास दि. १८.०३.२०२४ रोजी प्राप्त झाला. सदरील मूळ अर्ज मा. उपाध्यक्ष । प्राधिकरण या कार्यालयाकडून ई-टपाल व्दारे मा. मुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ या कार्यालयास वर्ग करण्यात आल्याचे ई टपाल नोंदीवरुन दिसून येते. मा. उपाध्यक्ष / प्राधिकरण या कार्यालयाकडून वर्ग करण्यात आलेले दैनंदिन टपाल मूळ अर्जासह परस्पर संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात येते. त्या अनुषंगाने आवक क्र. २९६४ दि. १८.०३.२०२४ रोजीचा उक्त माहिती अधिकार अर्ज मा. मुख्य अधिकारी मुंबई मंडळ यांचेकडे पाठविण्यात आला. सदर माहिती अधिकार अर्जाची ई-टपाल नोंदीची प्रत माहितीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे. तसेच मा. मुख्य अधिकारी / मुंबई मंडळ यांचं टपाल स्वीकारण्यात आलेल्या नोंदवहीची प्रत सुलभ संदर्भासाठी सोबत जोडण्यात येत आहे.*

*सदर मूळ अर्ज मा. सचिव/प्राधिकरण या कार्यालयाशी संबंधित नसल्याने, आपल्या मंडळाकडे वर्ग करण्यात आला असल्याचे दिसून येते, करीता, सदरच्या अर्जावर आपल्या कार्यालयाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची प्रत मा राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांना सादर करण्यात यावी, तसेच एक प्रत या कार्यालयास अवगत करण्यात यावी, ही विनंती."*

४. आयोगासमोर सुनावणी दि. १९.११.२०२५, दि. ११.१२.२०२५ व आजच्या सुनावणीसही अपिलार्थी कोणतीही सुचना न देता अनुपस्थित आहेत. यावरुन अपिलार्थींना माहिती मिळवून घेण्यास कोणतेही स्वारस्य दिसून येत नाही.

..२/-

५. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने झालेली कार्यवाहीची माहिती अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क कळवावी. तसेच जन माहिती अधिकारी यांनी यापुढे अपिलार्थींचा माहितीचा अर्ज संबंधीत विभागाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(३) अन्वये हस्तांतरीत करुन अपिलार्थींना कळविण्याची दक्षता घ्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर दि. १२.१२.२०२५ रोजीच्या आयोगाच्या आदेशानुसार प्रस्तावित शास्तीची व शिस्तभंगविषयक कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.**

**३) सदर अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai
सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 16-1-2026

**मुंबई**
**दिनांक : १६.०१.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**